सत्यमेव जयते

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

**महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील, मांग, मातंग, मिनिमादिग, दखनी- मांग, मांग- म्हशी,मदारी, गारुडी, राधे मांग, मार्ग-गारोडी, मांग- गारूडी युवक-युवतींसाठी बँक, रेल्वे, एल.आय.सी. इ. मध्ये लिपिक वर्गीय स्पर्धा परीक्षेच्या पूर्व तयारीसाठी मोफत निवासी प्रशिक्षण कार्यक्रम**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील मांग, मातंग, मिनिमादिग, दखनी- मांग, मांग- म्हशी, मदारी, गारुडी, राधे मांग, मांग- गारोडी, मांग- गारूडी युवक – युवतींसाठी **आय.बी.पी.एस, बँक, रेल्वे, एल.आय.सी, लिपीक व तत्सम पदांच्या स्पर्धा परिक्षेच्या पूर्व तयारीसाठी नि:शुल्क निवासी** प्रशिक्षणाकरीता **छत्रपती संभाजीनगर** या जिल्ह्याच्या ठिकाणी खालील नमूद प्रशिक्षण केंद्रांच्या माध्यमातून निवासी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. करिता पात्र उमेदवारांकडून दिनांक **२८/०४/२०२५** पासून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अनु. क्र. | प्रशिक्षण संस्थेचे नाव व जिल्ह्याचे नाव | एकूण जागा |
|---|---|---|
| १. | **सम्राट प्रतिष्ठाण उमरद खालसा संचलित, छत्रपती राजर्षी शाहू महाराज स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, छत्रपती संभाजीनगर**<br>**पत्ता :- प्लॉट नं १/१०७, आर्ज आंगन च्या पाठीमागे, पडेगाव, मिटमिटा, छत्रपती संभाजीनगर – ४३१००१ (छत्रपती संभाजीनगर)**<br>**मोबाईल क्र :- ९९६०२५३४६१, ९४२२५६२२२७,**<br>**ई-मेल :- samratpratishthan२०२२@gmail.com** | **७५** |
| | **एकूण** | **७५** |

**पात्रता :**

१) उमेदवार महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील मांग, मातंग, मिनिमादिग, दखनी- मांग, मांग- म्हशी,मदारी, गारुडी, राधे मांग, मांग- गारोडी, मांग- गारूडी घटकातील असावा.
२) उमेदवाराचे वय वर्ष १८ ते ३४ पर्यंत असावे.
३) उमेदवार किमान १२ वी उत्तीर्ण असावा.
४) उमेदवार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा.
५) उमेदवार दिव्यांग असल्यास ४०% पेक्षा जास्त प्रमाणात असलेल्या दिव्यांगत्वाचा दाखला सांक्षाकित प्रत सादर करावी.

**अर्ज करण्यासाठी QR scan करा**

**विद्यार्थी निवडीचे निकष :**

- एकूण प्राप्त अर्जातील उमेदवारांची चाळणी परीक्षेद्वारे गुणवत्ता यादी नुसार निवड करण्यात येईल.
- पात्र उमेदवारांची उत्पन्न मर्यादा रु.८ लाखांपर्यंत असावी.
- चाळणी परीक्षेचे स्वरूप :- संबंधित स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण आय.बी.पी.एस., एल.आय.सी., रेल्वे, बँक लिपीक व त्या समकक्ष पदांच्या परीक्षेच्या धर्तीवर असेल.

**आरक्षण :**

- ३० % जागा महिलांसाठी राखीव
- ५ % जागा दिव्यांगाकरीता राखीव
- १ % जागा अनाथांकरिता राखीव

**प्रशिक्षणाच्या अटी व शर्ती :**

- **सदरचे प्रशिक्षण पूर्णत: नि:शुल्क असून निवासी स्वरूपाचे असणार आहे.**
- **ऑनलाईन नोंदणी करण्याची शेवटची तारीख ०९/०५/२०२५**
- प्रशिक्षण कालावधी – ०६ महिने (निवासी)
- प्रशिक्षण कालावधीमध्ये विद्यार्थ्यांच्या निवास , चहा, नाश्ता व जेवणाची सोय प्रशिक्षण केंद्रात केली जाईल.
- निवड झालेल्या पात्र प्रशिक्षणार्थींना पुस्तक संचाकरीता प्रती प्रशिक्षणार्थी रु.५०००/- एवढी रक्कम अदा करण्यात येईल.
- सदर योजनेबाबत / प्रशिक्षणाबाबत काही वाद अथवा धोरणात्मक पेच/प्रसंग निर्माण झाल्यास याबाबतचे सर्व अंतिम अधिकार मा. महासंचालक, बार्टी यांना राहतील.
- प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण कालावधीमध्ये कोणतीही शासकीय/निमशासकीय खाजगी नोकरी अथवा व्यवसाय करता येणार नाही.
- ज्या उमेदवारांनी यापूर्वी बार्टी मार्फत (MPSC) महाराष्ट्र लोकसेवा आयोग-राज्यसेवा स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण, UPSC नागरी सेवा स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण, पोलीस व मिलिटरी भरती पूर्व प्रशिक्षण आणि बँक (IBPS) रेल्वे, एल.आय.सी. इ. व तत्सम स्पर्धा परीक्षांचे यापूर्वी प्रशिक्षण घेतले असेल त्यांची पुन्हा नव्याने प्रशिक्षणासाठी निवड केली जाणार नाही.

**अर्ज करण्याची अंतिम दिनांक व ऑनलाईन अर्ज करण्याकरिता लिंक** https://forms.gle/494pd4EKWmPPS5Q28 इच्छुक व पात्र उमेदवारांनी **दि.०९/०५/२०२५** पर्यंत या लिंकवर ऑनलाईन अर्जाची नोंदणी करावी.

**विभाग प्रमुख (IBPS)**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**